अंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

## Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

March 2022, Issue-87, Vol-01

**Editor**

**Dr. Bapu g. Gholap**

(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

"Printed by **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**

At.Post Limbaganesh, Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell 07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

14) BRAIN BASED TEACHING APPROACH: BRIDGING THE GAP BETWEEN OLD AND ...
NEERAJKUMAR TIWARI & SHYAM PRATAP SINGH ||66

15) पुराण कथान्तर्गत वैज्ञानिक कथा समिक्षा
श्री. मोरेश्वर गजानन पुंडशास्त्री, जि. यवतमाळ ||68

16) दुर्बल घटकांच्या मानवी हक्कांची पायमल्ली/उल्लंघन सद्यस्थितीचा अभ्यास
प्रा.डॉ.राजेंद्र बैसाणे, ता. जि. धुळे ||70

17) जाणीव पालकत्वाची
प्रा.डॉ.जितेश नारायण चव्हाण, जि.जळगाव ||75

18) संगीतातील ध्वनीविज्ञान
प्रा. डॉ. महेश शामराव दाडगे, परळी वैजनाथ ||79

19) खेळाडूंच्या संतुलन या घटकावर फ्री वेट प्रशिक्षण कार्यक्रमाचा होणारा परिणामाचा...
डॉ. दिपक भगवान जुंद्रे, जि. नाशिक ||80

20) पारंपारिक शिक्षण की ऑनलाईन शिक्षण
Prof. Minakshi M. Kaleshwarwar, Rajura ||82

21) घटस्फोट : एक सामाजिक समस्या
प्रा.डॉ.आर.डी.खताळ, जि.बीड ||85

22) शिवस्वरोदय शास्त्र व उपचाराची अनुभूती
श्री एच. डी. महाजन & श्री शशिकांत सावळे, पाचोरा ||87

23) भारताचे परराष्ट्र धोरण एक दृष्टिक्षेप
प्राचार्य डॉ. सुभाष गवई & दिगांबर पंढरी मिसाळ, जि. वाशिम ||90

24) ग्रामीण साहित्य संकल्पना, स्वरूप आणि व्याप्ती
प्रा. डॉ. सचिन अशोक पाटील, एरंडोल ||94

25) राष्ट्रभाषा की जरूरत
डॉ. शीला बघेल, बड़वानी (म.प्र.) ||101

26) विचारधारा का अन्त और इतिहास का अंत(End of Ideology and End of History)
डॉ॰ (श्रीमती) दर्शना, देवरिया ||104

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

ISSN: 2394 5303 | Impact Factor 8.012(IIJIF) | Printing Area® Peer-Reviewed International Journal | March 2022 Issue-87, Vol-01 | 085

21

# घटस्फोट : एक सामाजिक समस्या

प्रा.डॉ.आर.डी.खताळ
समाजशास्त्र विभाग,
कला आणि विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी,
ता.गेवराई, जि.बीड

**********

प्रस्ताविक :

घटस्फोट ही एक सामाजिक समस्या असून पती-पत्नीचे निर्माण झालेले वैध वैवाहिक संबंध कायदेशीररित्या तोडणे म्हणजेच घटस्फोट होय. भारतीय समाजात आणि हिंदू धर्मात विवाह हा एक धार्मिक संस्कार मानला जात होता. त्यामुळे विवाह मोडण्याचा आणि घटस्फोटाचा विषयच समाजासमोर नव्हता पण अलिकडच्या काळात सामाजिक बदलाचा आणि विचारसरणीतील बदलामुळे समाजात घटस्फोटाचे प्रमाण वाढताना दिसते. कागदपत्राच्या मान्यतेमुळे घटस्फोट सहजपणे घेतला आणि दिला जातो. समाजातील सर्व स्त्री-पुरुषांचे विवाह सफल होत शकत नाहीत. त्यामुळे एकमेकांसोबत जबरदस्तीने राहून आयुष्याचे वाटोळे करुन घेण्यापेक्षा पती-पत्नी घटस्फोटाचा मार्ग स्विकरताना दिसतात. यामुळे भारतासारख्या देशातही घटस्फोटाचे प्रमाण वाढताना दिसते. प्राचीन काळीही (कौटिल्य या धर्मवक्त्याने चार अधार्मिक विवाहांना असूर, गंधर्व, पैशाच आणि राक्षस) विवाह विच्छेदनाची परवानगी दिली होती. पती विश्वासघातकी असेल, नपुसंग असेल व्यसनाधिन असेल, बेपत्ता असेल तर अशावेळी पत्नीस घटस्फोटास परवानगी दिली होती.

भारतातील स्वातंत्र्यानंतर हिंदू विवाह अधिनियम १९५५ हा संयुक्त आणि परिपूर्ण देवरुपाचा कायदा भारतीय संसदेने पास केला. यातील कलम ४ नुसार धर्मशास्त्रासाठी परंपरा, न्यायनिर्णय व पाक्त अधिनियम वगळता इतर कोणत्याही उगमस्त्रोतांवर आधारित असलेला हिंदू विवाह विषयक कायदा रद्दबातल करण्यात आलेला असून पूर्वीच्या अधिनियमातील तरतूदी १९५५ च्या अधिनियमाशी विसंगत नसतील त्याचं चालू ठेवण्यात आल्या. अशाप्रकारे भारतातही घटस्फोटाला कायदेशीर मान्यता मिळाली.

घटस्फोट म्हणजे विवाह विघटन किंवा वैवाहिक जीवनाचा व संबंधाचा कायदेशीर शेवट त्यानंतर पती-पत्नी एकमेकांसाठी परके होतात. कारण त्यांचे नाते संपुष्टात येते. न्यायालयीन विभक्तीसाठी किंवा घटस्फोट घेण्यासाठी पीडित पती-पत्नीला खालील कारणांपैकी कोणत्याही कारणास्तव कलम १३ (१) नुसार दावा करता येतो.

विवाहानंतर स्वच्छेने व्यभिचार, क्रौर्याची वागणूक, संमतीशिवाय सतत दोन वर्षे त्याग, धर्मांतर, वेडेपणा मानसिक असंतुलन इत्यादी

**संशोधनाचा उद्देश :**

घटस्फोट : एक सामाजिक समस्या या संशोधन विषयासाठी खालीलप्रमाणे संशोधनाचा उद्देश निश्चित करण्यात आला.

- घटस्फोटाच्या समस्येची विविध कारणे, परिणाम आणि उपायांचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितके :**

घटस्फोट : एक सामाजिक समस्या या संशोधन विषयासाठी खालीलप्रमाणे गृहितके ठरविण्यात आली.

- घटस्फोट ही एक सामाजिक समस्या असून घटस्फोटाचे कुटूंब व्यवस्थेवर दूरगामी परिणाम होतात.

**घटस्फोटाची कारणे, मिमांसा :**

आधुनिक काळात घटस्फोटाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. याप्रमाणे विविध कारणे आहेत. शहरी, जीवनपध्दती, घटस्फोटाला अनुकूल, प्रतिकूल धर्मनियम, घटस्फोटासाठीचे सुलभ कायदे, नीती विषयक भिन्न कल्पना, श्रीमंती आणि गरिबी, औद्योगिकीकरण, मूल न होणे इत्यादी विविध कारणे घटस्फोटास कारणीभूत ठरतात. पण त्यापैकी प्रत्येकाला अपवाद असतात. उदा.कॅथलिक धर्मांचा घटस्फोटाला विरोध असतो. पण म्हणून कॅथलिक समाजात घटस्फोटाचे प्रमाण कमी आहे असे नाही. त्याचप्रमाणे इग्लंडमधील समाजात प्रोस्टेट असूनही तेथील घटस्फोटाचे प्रमाण तुलनेने कमी आहे. जपान शहरीकरण आणि औद्योगिकीकरणात आघाडीवर असूनही घटस्फोटाचे प्रमाण कमी आहे. बऱ्याच समाजशास्त्रज्ञानी काही कारणे महत्वाचे आणि निर्णायक मानली आहेत. १) शेती प्रधान समाजाच्या मानाने आजचा उद्योगप्रधान समाज अधिक अस्थिर व विघटीत असणे आणि स्थीर विवाहसंबंधाना प्रतिकूल अशी सामाजिक चलनशीलता मोठ्या प्रमाणात असणे. २) धर्म व आप्तसंबंधीयांची विवाहवर असलेली बंधने सिथिल होत जाणे. ३) विवाह हा एक करार मानून पती-पत्नीचे वैवाहिक सुख हेच विवाहाचे अंतिम ध्येय मानण्याच्या प्रवृत्तीमुळे केवळ वैयक्तिक हक्कावर भर देणे व सामाजिक कर्तव्य व जबाबदारी याची जाणीव न ठेवणे.

**घटस्फोटामुळे निर्माण होणाऱ्या समस्या :**

घटस्फोटामुळे त्रासदायक वाटणाऱ्या वैवाहिक संबंधातून स्वातंत्र्य मिळाले असले तरी त्यामुळे विविध समस्या निर्माण होतात. विशेषत: घटस्फोटानंतर स्त्रीला विविध कठीण समस्यांना तोंड द्यावे लागते. जर मिळकती किंवा आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण नसेल तर हे प्रश्न अधिकच जटिल बनतात. कायद्यात पोटगीची तरतूद असली तरी त्यामुळे प्रश्न सुटत नाहीत. घटस्फोटीत स्त्रीचा पुर्नविवाह सहजासहजी होत नाही. तिच्याकडे पहाण्याची समाजाची दृष्टी बऱ्याच अंशी पूर्व ग्रहदूषित असते. तिला जर मुले असतील तर तिचा पुर्नविवाह होणे अशक्य असते. पुर्नविवाहानंतर घटस्फोटिताच्या मुलांना होणारा सावत्रपणाचा त्रास होतो. त्यांची वाढ सर्वसाधारण मान्य वातावरणात होत नसल्यामुळे त्यांच्यात मनोविकृती व इतर स्वभावदोष निर्माण होण्याची शक्यता असते. ती एकाकी आणि पोरकी होण्याचाही संभव असतो. जर घटस्फोटीत व्यक्ती कर्तबगार मिळवती, त्याचप्रमाणे दृढ इच्छाशक्तीची नसेल तर तीही अशीच एकाकी व पोरकी होते. मानसिक प्रश्न महत्वाचे असले तरी आर्थिक, लैंगिक तसेच सामाजिक प्रतिष्ठेबाबतचे अनेक प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे सुखी जीवन जगण्याचा वैयक्तिक उद्देश सफल होत नाही. उलट समाज वास्तव्याच्या दृष्टीने ही एक चिंतेची बाब होऊ शकते. पाश्चात्य समाज घटस्फोटास अधिक निर्ढावलेला असला तरी तेथेही विभक्त कुटूंब संस्थेच्या नात्यागोत्याची कमी असल्यामुळे परिस्थितीचे गांभीर्य अधिकच वाढले आहे.

**उपाययोजना :**

समाजाचा घटस्फोटीतांकडे पाहण्याचा दृष्टीकोण दुषित असतो. त्यामुळे त्यांना अपमानीत जीवन जगावे लागते. शक्य तेथे त्यांचा पुर्नविवाह करण्याचा त्याचप्रमाणे त्यांचे पुर्नवसन करण्याचा प्रयत्न समाज स्वास्थासाठी आवश्यक असते. लग्नानंतर पती-पत्नीने परस्परांशी कसे वागावे? त्याबद्दलचे शिक्षण देणाऱ्या सामाजिक संस्थाही निर्माण होणे गरजेचे आहे. वैवाहिक जीवनाचा प्रारंभिक काळ अत्यंत नाजूक व महत्त्वाचा असतो. या काळात घरातील वडिलधाऱ्या व्यक्तींनी, मित्रांनी आणि आप्तेष्टांनी नवीन पती-पत्नीमध्ये गैरसमज निर्माण न होण्याच्या दृष्टीने व त्यांना मानसिकदृष्टया जवळ आणण्याच्या दृष्टीने जाणीवपूर्वक प्रयत्न करावयास पाहिजेत. घटस्फोट घ्यावाच लागला तर तो सुलभरीतीने व परस्परांच्या संमतीने घेण्याची तरतूद कायद्यात असावी. त्यामुळे परस्परांवर खरे-खोटे आरोप-प्रत्यारोप करण्याचा व साक्षी पुरावे गोळा करण्याचा प्रसंग न येता कटूता टाळता येईल. या सर्व व इतर बाबींचा विचार करुन पती-पत्नीला मार्गदर्शन करण्यासाठी एक विवाह मार्गदर्शन समितीची स्थापना सामाजिक कार्यकर्त्यांनी केली पाहिजे. अशा मार्गदर्शन करणाऱ्या विवाह संस्था दुसऱ्यामध्ये आहेत. विवाह हा समाज संघटनेचा मूलभूत पाया समजण्यात येतो. म्हणून विवाहाचे सातत्य टिकविण्यासाठी सर्वच समाजाचे लक्ष असते. घटस्फोटाने वैवाहिक जीवनातील सर्व प्रश्न सुटतात असे नाही.

**समारोप :**

आधुनिक काळात भारतीय समाज जुनी मूल्ये आणि नवी मूल्ये यांच्यातील अंतर समजून घेण्याचा प्रयत्न करत आहे. पण याबाबत संभ्रमावस्था दिसून येते. जुने तेच खरे की नवीन स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी जीवनपध्दती, विकासवादी दृष्टीकोण, आंतर क्रियामधील सामजस्य आणि देवाण घेवाणीतील न्यायाचा विचार हे चांगले आहेत. अशा वेळी पालक नात्यामधील-संबंधावर बरेच अवलंबून असते. शेवटी कुटूंबसंस्था, नातेसंस्था आणि समाज यांनी व्यक्तीवर बालपणापासूनचे संस्कार केले आहेत. यावर या समस्यांचे स्वरुप आणि त्यांचे भवितव्य अवलंबून असते. समाजातील या तीन संस्था व्यक्तीला माणूस म्हणून घडविण्यात महत्वाच्या ठरतात. विवाह कुटूंब आणि नाते संस्था या तीन संस्थाच व्यक्तीच्या जीवनातील बरेचशी काम संबंधित असतात. अशाप्रकारे समाजाची व्यवस्था कार्यरत राहिल्यास समाजातील घटस्फोटाचे प्रमाण बऱ्याच अशी कमी होण्यास सहाय्य होईल.

**संदर्भ सूची :**


१) Social-problems - Colbert Roy

२) भारतीय समाज : प्रश्न आणि समस्या : डॉ. सुधा काळदाते

३) भारतीय सामाजिक समस्या : डॉ.दा.धो.काचोळे

४) भारताच्या विघटनात्मक समस्या : डॉ.दा.धो काचोळे

५) भारतीय समाज : प्रश्न आणि समस्या - डॉ.काचोळे

६) Indian Social Problem : Gupta M.L.


❑❑❑